# मणिपालमध्ये ट्रिपल बायपास शस्त्रक्रिया

**पणजी, दि. १९ (पत्रक) :**

मणिपाल हॉस्पिटल्स-गोवामध्ये ७९ वर्षीय रामकृष्ण साळगांवकर या वृद्ध रुग्णास बायपास शस्त्रक्रियेव्दारे नवे आयुष्य मिळाले. वैद्यकीय तंत्रज्ञानामध्ये नवनवे बदल होत असल्याने आणि नानाविध कौशल्य असलेले डॉक्टरही उपलब्ध होत असल्याने हृदय शस्त्रक्रिया आता तितकी धोक्याची राहिलेली नाही तसेच अशी शस्त्रक्रिया करण्यात आता वयाचा अडथळाही कमी झाला आहे. साळगांवकर यांच्यावर झालेली शस्त्रक्रिया ही याचेच द्योतक आहे. मणिपाल हॉस्पिटल्स गोवामधील हृदयविकार शल्यविशारद डॉ. बाला श्रीनिवासन, हृदय भूलतज्ञ डॉ. दिव्या महालदार, हृदयविकार तज्ञ डॉ. अमर प्रभुदेसाई आणि डॉ. निखिल सोनटक्के यांचा समावेश असलेल्या कार्डिओथेरॅसिक पथकाने ही शस्त्रक्रिया यशस्वीपणे केली.

रामकृष्ण साळगावकर यांच्यावर शस्त्रक्रिया होण्यापूर्वी आठवडाभर आधी हृदयविकाराचा झटका आला होता. या झटक्यामुळे त्यांच्या फुफ्फुसामध्ये शरीरातील पाणी साठले गेले आणि त्याचा परिणाम म्हणजे त्यांचे हृदय योग्यपणे काम करेनासे झाले. तसेच फुफ्फुसामध्ये पाणी साठल्यानेही पोटात तीव्र वेदना जाणवत होत्या आणि या अवस्थेमुळे त्यांना श्वसनाचाही त्रास होऊ लागला. ट्रिपल बायपास शस्त्रक्रियेदरम्यान त्यांना सततपणे ऑक्सिजनचा पुरवठा करण्यात येत होता. शस्त्रक्रियेनंतर सहा दिवसांतच रुग्णाला घरी जाऊ देण्यात आले आणि आता तो सामान्यपणे पायऱ्या उतरू आणि चढू शकलो.



# मणिपालमध्ये ट्रिपल बायपास शस्त्रक्रिया यशस्वी

पणजी : मणिपाल हॉस्पिटल्समध्ये ७९ वर्षीय रामकृष्ण साळगावकर या रुग्णास बायपास शस्त्रक्रियेद्वारे नवे आयुष्य मिळाले. मणिपाल हॉसिनफटल्समधील हृदयविकार शल्यविशारद डॉ. बाला श्रीनिवासन, हृदय भूलतज्ञ डॉ. दिव्या महालदार, हृदयविकार तज्ज्ञ डॉ. अमर प्रभुदेसाई आणि डॉ. निखिल सोनटक्के यांचा समावेश असलेल्या कार्डिओथोरॅसिक पथकाने ही शस्त्रक्रिया यशस्वीपणे केली.

रामकृष्ण साळगावकर यांना शस्त्रक्रिया होण्यापूर्वी आठवडाभर आधी हृदयविकाराचा झटका आला होता. या झटक्यामुळे त्यांच्या फुफ्फुसामध्ये पाणी साठल्याने पोटात तीव्र वेदना जाणवत होत्या. या अवस्थेमुळे त्यांना श्वसनाचाही त्रास होऊ लागला. ट्रिपल बायपास शस्त्रक्रियेदरम्यान त्यांना सततपणे ऑक्सिजनचा पुरवठा करण्यात येत होता.

यासंदर्भात बोलताना श्रीनिवासन म्हणाले, 'पूर्वी ज्येष्ठ नागरिकांवर पारंपरिक पद्धतीने बायपास शस्त्रक्रिया करणे धोकादायक ठरत होते; पण आता वैज्ञानिक आविष्कार आणि नवनव्या तंत्रज्ञानाचे आगमन झाल्याने बायपास शस्त्रक्रियाही सुरक्षित व सुलभ झाल्या आहेत.'

शस्त्रक्रियेनंतर सहा दिवसातच रुग्णाला घरी जाऊ देण्यात आले. साळगावकर हे आता सामान्यपणे पायऱ्या किंवा जिना चढतात. शस्त्रक्रियेनंतर त्यांची पहिली तपासणी करण्यात आली असून त्यांना आता कोणताही त्रास जाणवत नसल्याचे दिसून आले.



# Triple bypass surgery performed

**PANJIM:** A triple bypass surgery successfully performed at Manipal Hospitals, Goa, on a 79-year-old patient Ramkrishna Bhaskar Salgaonkar. The surgery was conducted by the cardiothoracic team comprising of Dr Bala Srinivasan, Dr. Divya Mahaldar, Dr Amar Prabhudesai and Dr Nikhil Sontakke. Ramakrishna suffered cardiac arrest a week prior to the surgery. As a result of the attack his lungs were filled with body fluids which in turn hampered the normal functioning of his heart. The depositions of fluids lead to acute agony and trauma to the patient causing breathlessness.

# Manipal perfomrs a triple bypass

**PANAJI:** Manipal Hospitals Goa recently gave a new lease of life to a 79-year old patient, Ramkrishna Bhaskar Salgaonkar who underwent a triple bypass surgery. The surgery was conducted by the Cardio-thoracic team at Manipal Hospital, Goa comprising of Dr. Bala Srinivasan - Cardiac surgeon. Ramakrishna suffered from cardiac arrest a week prior to the surgery. As a result of the attack his lungs were filled with body fluids which were in tum hampering the normal functioning of his heart.